॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या उद्योग व अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्यावतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बौध्दिकसंपदा अधिकार चेअर स्थापनेला मान्यता देण्यात आली आहे. या चेअरमुळे विद्यापीठात बौध्दिकसंपदा अधिकाराचा अभ्यास, शिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळणार आहे.

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्यावतीने देशभरात १९ विद्यापीठ व उच्च शिक्षण संस्थांमध्ये बौध्दिकसंपदा अधिकार चेअर स्थापनेला परवानगी देण्यात आली असून नुकत्याच जाहीर झालेल्या या यादीमध्ये महाराष्ट्रातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या एकमेव विद्यापीठाचा समावेश आहे. भारत सरकारने बौध्दिकसंपदा अधिकाराविषयी काही वर्षापूर्वी धोरण निश्चित केले. बौध्दिकसंपदा हक्काबाबत गुणवत्तापूर्ण अध्यापन व संशोधन, अध्यापन क्षमता आणि अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी तसेच बौध्दिकसंपदा अधिकाराच्या अभ्यासाला, संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी चेअर्स स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने गतवर्षी भारत सरकारकडे बौध्दिकसंपदा अधिकाराच्या अध्यापनशास्त्र आणि संशोधनासाठीच्या योजने अंतर्गत प्रस्ताव दाखल केला होता. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील बौध्दिकसंपदा कक्षाचे समन्वयक डॉ. विकास गीते यांनी १ कोटी २७ लाख रुपयांचा हा प्रस्ताव तयार केला होता. विद्यापीठाने आजपर्यंत ६२ पेटंट फाईल्स केलेले असून २६ पेटंटना प्रत्यक्ष मान्यता मिळाली आहे. ११ पेटंट पडताळणीच्या पातळीवर आहेत. संशोधनाला प्रोत्साहन मिळावे यासाठी विद्यापीठाने विविध योजना सुरू केल्या आहेत. ज्यामध्ये कुलगुरू पेटंट प्रोत्साहन योजनेचा समावेश आहे तसेच विविध राष्ट्रीय संस्थासोबत या कक्षामार्फत सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत. अभ्यासक्रमात देखील बौध्दिकसंपदा अधिकाराचा समावेश विद्यापीठाने केला आहे. विद्यापीठाने दाखल केलेल्या या सर्व माहितीचा अंतर्भाव प्रस्तावात करण्यात आला. त्याची दखल घेऊन पुढील ५ वर्षासाठी विद्यापीठाला ही चेअर मंजूर झाली असून यामध्ये आता चेअर प्रोफेसर आणि दोन संशोधन सहायक ही पदे भरली जातील. याशिवाय संशोधनाच्या अनुषंगाने पुस्तके आणि जर्नल्स प्राप्त होतील. पेटंटबाबत विविध प्रकारच्या कार्यशाळा, परिषदा या चेअरमार्फत घेतल्या जातील. या चेअरमुळे बौध्दिकसंपदा अधिकाराबाबत संशोधनाला अधिक चालना मिळेल तसेच उद्योग आणि विद्यापीठ यांच्यातील शैक्षणिक परस्पर संबंध वाढीला लागतील.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १२ मे, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी